अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - १०/ २०१२.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १५-०३-२०१२.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक १० , दिनांक १९-०३-२०१२.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.................................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ड) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा सोमवार दिनांक १९-०३-२०१२ रोजी दुपारी १-०० वाजता माळीवाडा येथील **"जुने महानगरपालिका सभागृहात "** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय सूची.
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक १०    सोमवार दिनांक  १९ / ०३ /२०१२ रोजी दुपारी १-०० वाजता होणा-या
मा.खास सभेची विषय पत्रिका.

---*---

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ३६ | दुखवट्याचा प्रस्ताव. |
| ३७ | महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभूत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणासाठी जिल्हा योजने अंतर्गत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) राबविण्याबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| ३८ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक :  १५ / ०३ /२०१२.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

दिनांक १५/०३/२०१२.

प्रति,
मा.महापौर साहेब,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

विषय :- मा.खास सभा लवकरात लवकर बोलविण्या बाबत...

महोदय,

विनंतीपुर्वक पत्र देण्यांत येते की, महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभूत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणासाठी जिल्हा योजने अंतर्गत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) राबविण्याबाबत अहमदनगर महानगरपालिकेची मा.खास सभा लवकरात लवकर बोलविण्यांत यावी हि विनंती.

तरी मा.महासभा बोलविण्यांत यावी हि विनंती.

आपले विश्वासु,

| अ.नं. | नांव | स्वाक्षरी |
| --- | --- | --- |

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ३६** **दिनांक : १९ /०३/२०११**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | अहमदनगर वस्तू संग्रहालयाचे अभिरक्षक मिलींद सुरेश जोशी यांचे शुक्रवार दिनांक २४/०२/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधना निमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| २ | श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष प्रतापराव उर्फ तात्यासाहेब बाबुराव गोडसे यांचे मंगळवार दिनांक २८/०२/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधना निमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | नगरशहरातील सामाजिक कार्यकर्त्या सौ.उषादेवी लालचंद नय्यर यांचे गुरुवार दिनांक ०१/०३/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधना निमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांचे विश्वासु सहकारी अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिक केशव बाबूराव झेंडे उर्फ झेंडे पाटील यांचे शुक्रवार दिनांक ०२/०३/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधना निमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | संगमनेर खुर्द येथील कॉग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते माधवराव लक्ष्मण गुंजाळ यांचे सोमवार दिनांक ०५/०३/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधना निमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | अहमदनगर येथील सिधी हायस्कुलचे शिक्षक श्री.जी.टी.आहुजा यांचे गुरुवार दिनांक ०८/०३/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधना निमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ७ | हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ चित्रपट निर्माता-दिग्दर्शक व अभिनेते जॉय मुखर्जी यांचे शुक्रवार दिनांक ०९/०३/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधना निमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | नगर अर्बन बँकेतील कनिष्ठ अधिकारी श्री विलास शुक्रे यांचे शनिवार दिनांक १०/०३/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधना निमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | नगर शहरातील शिवसेनेचे पदाधिकारी श्री.दिगंबर ढवण यांचे मातोश्री श्रीमती ताराबाई नारायण ढवण यांचे शुक्रवार दिनांक १०/०३/२०१२ रोजी झालेल्या दु:खद निधना निमित्त दु:खवटयाचा प्रस्ताव. |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ३७** **दिनांक : १९ / ०३ /२०१२.**

---

**प्रस्तावाचा विषय :** महाराष्ट्रातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभूत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणासाठी जिल्हा योजने अंतर्गत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) राबविण्याबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १) शासन निर्णय क्रमांक - एनयुआर-२०१०/प्र.क्र.३१७/१०/नवि-३३ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक ०८ नोव्हेंबर २०१०.

२) शासन निर्णय क्रमांक-जिवायो-१००७/प्र.क्र.३९/क-१४४४ दि.१६ फेब्रुवारी २००८.

३) शासन निर्णय क्रमांक-एनयुआर-२००८/प्र.क्र.२०३/नवि-३३ दि.२० नोव्हेंबर २०१०.

राज्यातील नागरी भागांच्या दिर्घकालीन गरजांचा विचार करुन त्यांचा सुनियोजित विकास साधण्याच्या दृष्टीने राज्यात एक सर्व समावेशक अभियान राबविण्याच्या उद्देशाने सर्वंकष विचार करुन शासनाने "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान " हे अभियान राबविण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र.१ वरील शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर शासन निर्णयामध्ये उक्त महाअभियान राज्यस्तरावरुन राबविण्याची कार्यपध्दती स्पष्ट करण्यांत आली आहे. आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाचा संदर्भात जिल्हा योजनेखाली करावयाच्या कार्यवाही विषयी पुढील प्रमाणे तरतूद करण्यांत आली आहे.

"महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत या शासन निर्णयाच्या परिच्छेद ०२ मध्ये दर्शविलेल्या ज्या क्षेत्रातील प्रकल्प अनुज्ञेय आहेत त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान उपलब्ध व्हावे, यासाठी एक स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यांत येईल. त्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील. जिल्हा योजने अंतर्गत सदर लेखाशिर्शाखाली उपलब्ध होणा-या तरतुदीतून घ्यावयाच्या प्रकल्पासाठी देखील संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची मागणी असल्यास परिच्छेद ६ (iii) मध्ये दर्शविलेल्या वित्तीय आकृतिबंधाच्या अधिन राहून आवश्यक कर्जाचा हिस्सा, MUIDCI किंवा MMRDA कडुन उपलब्ध करुन देण्यांत येईल."

सदर तरतूदीच्या अनुषंगाने जिल्हा योजनेतून नागरी पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) हे अभियान जिल्हास्तरावरुन राबविण्याच्या दृष्टीने शासन निर्णय घेतला आहे. सदर अभियाना अंतर्गत बाब क्र.४ नुसार " नागरी दळणवळण साधनांचा विकास " या अंतर्गत खाली नमूद केलेल्या ठिकाणचे महत्वाचे नागरी रस्ते विकसित करणे बाबतचा प्रस्ताव तयार केला आहे. याव्यतिरिक्त मा.महासभा ठरविल ते रस्ते विकसित करणे बाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, यांचेकडेस सादर करता येईल.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | एकविरा चौक ते पारीजात चौक दरम्यानच्या रस्त्याचे रुंदीकरणासह मजबूतीकरण व डांबरीकरण करणे | ४०.०० लाख |
| २ | गंगा उद्यान ते कलानगरचौक ते सपकाळ चौक दरम्यानच्या रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे | ५०.०० लाख |
| ३ | प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे | ३०.०० लाख |
| ४ | गुलमोहोर रोड ते महाराजा हॉटेल ते कुष्ठधाम रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९०.०० लाख |
| ५ | टिळकरोड रस्त्याचे डांबरीकरण करुन सुशोभिकरण करणे | ४५.०० लाख |
| ६ | बालिकाश्रम रोड ते व्दारकानगरी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १५.०० लाख |
| ७ | गुलमोहोर रोड ते आसरा सोसायटीपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २५.०० लाख |
| ८ | टी.व्ही.सेंटर ते झोपडी कॅन्टीन पर्यंतच्या रस्त्याचे मजबूतीकरण करुन डांबरीकरण करणे. | ४०.०० लाख |
| ९ | सनी पॅलेस ते तपोवन रोड दरम्यानच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १०.०० लाख |
| १० | एल.आय.सी.ऑफिस ते आफाली समोरील झोपडपट्टी ते स्वस्तिक हॉटेल पर्यंत रस्त्याचे मजबूतीकरण करुन डांबरीकरण करणे. | १५.०० लाख |
| ११ | नित्यसेवा सोसायटी ते औरंगाबाद रोड पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे | १०.०० लाख |
| १२ | इम्पिरियल चोक ते चाणक्य चौक ते विठ्ठल मंदिरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ३०.०० लाख |
| १३ | केडगांव, भुषणनगर भागातील अंतर्गत रस्ते मजबुतीकरण करणे. | ३०.०० लाख |
| १४ | डौले हॉस्पीटल ते रासनेनगर ते भिडे हॉस्पीटल पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | ३०.०० लाख |
| १५ | नगर-पुणे रोड ते केडगांव शाहुनगरपर्यंत रस्ता मजबूतीकरण करुन डांबरीकरण करणे | २०.०० लाख |
| | **एकुण** | **४८०.०० लाख** |

सदर प्रकल्पास मा.जिल्हाधिकारी, यांचेकडुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आल्यावर अशा प्रकल्पासाठी खाली नमुद केलेल्या वित्तीय आकृतीबंधानुसार अर्थसहाय्य देय व अनुज्ञेय राहील.

| अ.नं. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | अनुदान (प्रकल्पाच्या मंजूर किंमतीपैकी) | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा (प्रकल्पाच्या मंजूर किंमतीपैकी) |
|---|---|---|---|
| १ | सर्व महानगरपालिका व सर्व अ वर्ग नगरपालिका | ५०% | ५०% |

सदर शासन निर्णयानुसार वरील १५ विकास कामांचे रक्कम रु.४८०.०० लाखाच्या प्रस्तावांचे ढोबळ अंदाजपत्रकास मा.महासभेची मान्यता घेवून मा.जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती, अ.नगर यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. यास्तव सदरचा ऑफिस रिपोर्ट मा.महासभेकडे पाठविणेस आदेशार्थ सविनय सादर.

यावर इन्चार्ज अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुसार सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणेस्तव सविनय सादर.

यावर शहरअभियंता यांचा अभिप्राय की, सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे मान्यतेस सादर करणे आवश्यक आहे. मान्यतेस तथा पुढील आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक व मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचे अभिप्रायाप्रमाणे प्रस्तावित "अ" मा.महासभेच्या मान्यतेकरीता मा.महासभेपुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसारचा विषय मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

चर्चा :-

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- महानगरपालिके मार्फत देण्यांत येणारे जन्म दाखले वेळेवर दिले जात नाही. जन्म दाखल्यांसाठी नागरिकांना अनेक वेळा चकरा माराव्या लागतात. नागरीकांची एकप्रकारे अडवणुक केली जाते. उमेश प्रतापचंद या मुलाचा जन्म दाखला दुरुस्ती करुन देणे बाबत आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुनही रेकॉर्ड विभागाकडुन अद्यापपर्यंत नावात दुरुस्ती होवुन दाखला दिला गेलेला नाही. उमेश प्रतापचंद या मध्ये फक्त उमेश प्रताप झाल्याने उमेश प्रतापचंद अशी दुरुस्ती करुन दाखला मिळणे बाबत मागणी केलेली होती.

डॉ.श्री.राजुरकर :- नावातील दुरुस्ती करणे बाबत नागरिकांचा अर्ज आल्यानंतर सदर अर्जावर ५ दिवसांत कार्यवाही करणे आवश्यक आहे. जुने जन्म दाखले असतील तर ते रेकॉर्ड किपर यांचेकडे जमा केलेले असतात.

सौ.मुथ्था रेकॉर्ड किपर :- नांव दुरुस्ती बाबत केलेल्या अर्जानुसार रेकॉर्ड वर नोंद घेतली गेलेली नसल्याने संबंधितांना नावाची दुरुस्ती होवुन जन्म दाखला देणे बाबत कार्यवाही चालू आहे. अद्यापपर्यंतही नावाची दुरुस्ती संबंधितांनी केलेली नाही. सदरचे काम हे रेकॉर्ड विभागाकडील नसुन जन्म-मृत्यु विभागाकडील आहे.

मा.सौ.मालनताई ढोणे :- रेकॉर्ड विभागाकडुन जन्म-मृत्यु दाखले मिळणे बाबत नागरिकांना वारंवार चकरा माराव्या लागतात. रेकॉर्ड विभागाकडुन वेळेवर दाखले दिले जात नाहीत. सदर ठिकाणचे कर्मचारी हे नेहमी कामात टाळाटाळ करतात.

मा.श्री.निखिल वारे :- मागील सर्व साधारण सभेमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील महानगरपालिका मालकीची रक्तपेढी सुधारणा बाबत विषय घेण्यांत आलेला होता. त्यानंतरही स्थानिक वर्तमान पत्रांमधुन सदर रक्तपेढी बाबत अनेक वेगवेगळया प्रकारच्या बातम्या येत आहेत. रक्तपेढीचा परवाना रद्द करण्यांत आलेला आहे काय ? त्याबाबतचा प्रशासनाने खुलासा करावा.

मा.आयुक्त सो :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथील रक्तपेढी बाबत हलगर्जी पणा करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यांत आलेली आहे. सदर ठिकाणी दुरुस्तीची कामे चालू झालेली आहेत. रक्तपेढी परवान्या बाबत १४ तारखेस सुनावणी ठेवण्यांत आलेली होती. सदर सुनावणीस महानगरपालिकेस बोलाविण्यांत आलेले होते. सदर सुनावणीचा अद्याप निकाल महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही.

मा.श्री.निखिल वारे :- महानगरपालिके मार्फत नविन रक्त पेढी करीता परवाना मागणी केली आहे काय ?

मा.आयुक्त सो :- नविन रक्तपेढी सुरु करणे बाबत महानगरपालिकेने मागणी केलेली नाही.

मा.श्री.निखिल वारे :- महानगरपालिके मार्फत चालविण्यांत येणा-या ओपीडी किती आहेत. त्याठिकाणी असणारा कर्मचारी वर्ग हा पुर्ण वेळ कामावर हजर असतो काय ? कर्मचारी नेमुन दिलेल्या कामाच्या ठिकाणी वेळेवर हजर नसतात. हजेरी पत्रकावर स्वाक्ष-या करुन पाच ते दहा मिनीटात कामाच्या ठिकाणावरुन निघुन जातात.

डॉ.श्री.राजुरकर प्र.आरोग्याधिकारी :- महानगरपालिके मार्फतचा सात ठिकाणी आरोग्य केंद्र चालू आहेत. महानगरपालिके कडे डॉक्टरांची संख्या कमी असल्याने सर्वच ठिकाणी एका वेळी सुविधा उपलब्ध करुन देता येत नाहीत. उर्वरीत कर्मचारी यांच्या कामाच्या वेळा सकाळी १० ते २ व दुपारी ४ ते ७ अशा आहेत.

मा.महापौर सो :- महानगरपालिके मार्फत नगरवासियांना सुविधा देतांना कर्मचा-यां मार्फत कामे करुन घेतांना संबंधित ठिकाणचे कर्मचारी हे नेमुन दिलेल्या ठिकाणी आणि वेळेत कामावर हजर नसतात. श्री.निखिल वारे यांच्या म्हणण्याप्रमाणे माझ्या कडेही कर्मचा-यां बाबत अशाच प्रकारच्या अनेक तक्रारी आलेल्या आहेत. १ ते २ तास कर्मचारी कामाच्या ठिकाणी येवुन किरकोळ स्वरुपात काम करुन निघुन जातात. परिणामी नागरिकांना चांगल्या सुविधा महानगरपालिका पुरवू शकत नाही.

मा.श्री.संजय चोपडा :- अहमदनगर शहरातील अमरधाम स्मशानभुमी येथील दयनिय परिस्थिती बाबत मी यापुर्वी अनेकवेळा निवेदन देवुनही तेथील कामे केली जात नाहीत. अमरधाम मधील विद्युत दाहिनी करीता महानगरपालिके मार्फत कर्मचारी नेमणे बाबत यापुर्वी अनेक वेळा लेखी दिलेले असतांनाही त्याठिकाणी महानगरपालिकेचा कर्मचारी अद्यापपर्यंत दिला गेलेला नाही. सदर ठिकाणी साफसफाई केली जात नाही.

मा.आयुक्त सो :- महानगरपालिका मालकीच्या अमरधाम येथे महानगरपालिकेने कर्मचारी उपलब्ध करुन दिलेले आहेत. अमरधाम मधील दुरुस्ती बाबत प्रस्ताव तयार करण्यांत आलेले आहेत.

मा.श्री.नितीन शेलार :- नुकतीच अहमदनगर महानगरपालिकेने सन २०१२ ची नगरपरिषद दैनंदिनी छपाई करुन माहे मार्च मध्ये सर्व नगरसेवकांना वाटप करण्यांत आलेली आहे. वास्तविक पाहता सदरची दैनंदिनी ही दिनांक १ जानेवारी २०१२ रोजी नगरसेवकांना मिळणे अपेक्षित आहे. सदर दैनंदिनी मध्ये आपल्या अहमदनगर शहरातील खासदार मा.श्री.दिलीपजी गांधी यांचा फोटो असणे अपेक्षित आहे. मा.श्री.दिलीपजी गांधी यांच्या खासदार निधीमधुन अहमदनगर शहरामध्ये विविध विकास कामे झालेली आहेत. त्यामुळे त्यांचा फोटो असणे आवश्यक आहे. सदर दैनंदिनी मध्ये त्यांचा फोटो नसल्याने आम्ही सर्व भाजपा नगरसेवक सदर दैनंदिनीचा निषेध करीत आहोत.

मा.श्री.किशोर डागवाले :- सदर दैनंदिनी मध्ये मा.श्री.राज ठाकरे साहेब यांचा फोटो घेणे आवश्यक होते. महानगरपालिके मार्फत तयार करण्यांत आलेली दैनंदिनी माहे जानेवारी मध्ये मिळणे अपेक्षित आहे.

मा.श्री.निखिल वारे :- महानगरपालिके मार्फत तयार करण्यांत आलेल्या नगरपरिषद दैनंदिनी २०१२ मध्ये सर्वश्री.मा.बाळासाहेबजी थोरात, मा.श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांचेही फोटो घेणे आवश्यक होते.

मा.श्री.संजय चोपडा :- महावीर जयंती महानगरपालिके मार्फत साजरी करणे बाबत मी यापुर्वी अनेकवेळा निवेदन देवुनही महानगरपालिकेच्या सार्वत्रिक कार्यक्रमांमध्ये महावीर जयंतीचा समावेश करण्यांत आलेला नाही. महानगरपालिके मार्फत महावीर जयंती साजरी करण्यांत यावी.

सौ.पारगांवकर प्र.प्रसिध्दी अधिकारी :- महानगरपालिके मार्फत छपाई करण्यांत येणारी नगरपरिषद दैनंदिनी २०१२ करीता सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांचेकडुन नगरपरिषद दैनंदिनीकरीता आवश्यक असणारी सर्व माहिती पाठविणे बाबत सर्व संबंधितांना पत्र देवुन कळविण्यांत आले होते. यानंतरही ज्या विभागांची माहिती आलेली नाही त्यांना पुन्हा स्मरणपत्र देवुन दैनंदिनी करीता आवश्यक असणारी माहिती पाठविणे बाबत दिनांक १२/०८/२०११ रोजी कळविण्यांत आलेले होते. सर्व संबंधितांची माहिती एकत्रित करुन जा.क्र.प्रसिध्दी ४०९ दिनांक २२/०९/२०११ रोजी रेकॉर्ड विभागाकडे दैनंदिन छपाई करणे करीता पाठविण्यांत आलेले होते. पुढील कार्यवाही रेकॉर्ड विभागाने करणे अपेक्षित आहे.

मा.श्री.किशोर डागवाले :- महानगरपालिके मार्फत प्रकाशित करण्यांत येणा-या नगरपरिषद दैनंदिनी या माहे जानेवारी मध्येच सर्वांना पोहोच होतील याबाबत पुढील काळात दक्षता घेण्यांत यावी.

मा.श्री.सचिन पारखी :- विधानपरिषद विरोधी पक्ष नेते यांचेही फोटो सदर दैनंदिनी मध्ये येणे आवश्यक होते.

मा.श्री.अंबादास पंधाडे :- अहमदनगर शहरातील आमदार मा.श्री.अरुणकाका जगताप यांचाही सदर दैनंदिनी मध्ये फोटो घेणे आवश्यक आहे.

श्रीमती.मुथ्था रेकॉर्ड विभाग प्रमुख :- महानगरपालिके मार्फत तयार करण्यांत येणा-या नगरपरिषद दैनंदिनी छपाई करणे करीता दिनांक ०१/१२/२०११ रोजी प्रेसमध्ये देण्यांत आलेल्या होत्या. प्रेस मध्ये मी स्वतः तीन-चार वेळा जावुन दैनंदिनी लवकरात लवकर छपाई करणे बाबत कार्यवाही केलेली आहे.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत करावयाच्या कामांबाबतचे प्रस्ताव या पुर्वीही पाठविण्यांत आलेले होते. त्याबाबत काय कार्यवाही करण्यांत आलेली आहे. याबाबत खुलासा करण्यांत यावा.

मा.श्री.सचिन पारखी :- यापुर्वी मंजूरी करीता पाठविण्यांत आलेल्या यादी मध्ये कोण-कोणते रस्ते घेण्यात आलेले होते. याबाबत माहिती द्यावी.

श्री.मगर प्र.शहरअभियंता :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत दिनांक ३१/०३/२०११ रोजी ७ कामांचे विषयास मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी घेवुन प्रस्ताव मंजूरीकरीता मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे पाठविणेत आलेला होता.रक्कम रु.४.७४ कोटीचे कामे प्रस्तावित करण्यांत आलेले होते. मा.जिल्हाधिकारी,अ.नगर यांनी सदर प्रस्तावास मंजूरी दिलेली नाही. सदर योजनेचे काम पहाणारे श्री.मोरे यांचेकडेही अनेकवेळा पाठपुरावा करुनही मंजूरी मिळालेली नाही. सदर प्रस्तावांबाबत अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री यांचे स्वीय सहाय्यकांकडेही अनेकवेळा पाठपुरावा केलेला आहे. तरीही सदर प्रस्तावास मंजूरी मिळालेली नाही.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- सदर पाठविण्यांत आलेले प्रस्ताव त्यांनी दिलेल्या निकषानुसार तयार करुन पाठविण्यांत आले होते किंवा कसे ? परिपूर्ण प्रस्ताव पाठविले तरीही मंजूरी का मिळालेली नाही.

श्री.मगर प्र.शहर अभियंता :- मा.महासभेची मंजूरी घेवुन प्रस्ताव परिपूर्ण करुन मंजूरीसाठी पाठविण्यांत आलेले होते. त्यात कुठल्याही प्रकारच्या त्रुटी शिल्लक राहिलेल्या नव्हत्या .

मा.श्री.बाळासाहेब पवार :- मागील प्रस्ताव परिपूर्ण पाठवुनही त्यांना अद्यापपर्यंत मंजूरी मिळालेली नाही. आज सर्व साधारण सभेत मांडलेल्या विषयातील प्रस्ताव मंजूर करुन पाठविल्यास त्यास मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांची मंजूरी मिळेलच असे कशावरुन .

मा.आयुक्त सो :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान ही योजना फक्त नगरपरिषदांसाठीच आहे असे संबंधितांचे म्हणणे होते. या त्यांच्या शंकेचे योग्य त्या प्रकारे निरसन करुन दिलेले असल्याने या वर्षी पुन्हा सदर योजने मध्ये नगर शहरात राबवावयाच्या विकास कामांचे प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस पाठविणे आवश्यक आहे.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- मागील वेळी पाठविण्यांत आलेल्या कामांच्या यादीमधील कामे आजच्या विषयांमध्ये घेतली गेलेली आहेत काय ? या योजनेमधुन नगर शहरातील जी विविध विकास कामे घ्यावयाची आहेत. त्याबाबत नगरसेवकांना काहीही कल्पना दिलेली नाही. सदर योजनेमधुन उपनगरातील रस्ते का घेण्यांत आलेले नाहीत. पुर्वी ज्या ठिकाणी कामे केली तेथील कामे पुन्हा-पुन्हा का घेण्यांत येतात. हद्दवाढीमध्ये ज्या नविन गावांचा समावेश झालेला आहे. त्याठिकाणी अद्यापपर्यंत कुठलेही मोठे काम झालेले नाही. त्या भागांचा समावेश का करण्यांत आला नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मध्यंतरीच्या काळात महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री.मगर यांनी राजीनामा दिल्याबाबत कळाले होते. ते खरे आहे काय ?

मा.आयुक्त सो :- राजीनाम्या बाबत त्यांनी नोटीस दिलेली आहे. सदरची नोटीस मान्य करावयाची किंवा नाही. ही प्रशासनाची बाब आहे. अद्यापपर्यंत मान्य केलेली नाही.

मा.श्री.बाळासाहेब पवार / मा.श्री.निखिल वारे :- प्रोफेसर कॉलनी टी.व्ही.सेंटर ते झोपडीकॅन्टीन हा रस्ता ४ वर्षा पुर्वी केलेला आहे. पुन्हा त्याच रस्त्यावर खर्च कसा करणार पुन्हा यादीतील सर्व रस्त्यांचा फेर सर्व्हे करुन ज्या भागातील रस्त्यांची खरोखरच आवश्यकता आहे. तीच कामे घेण्यांत यावीत.

श्री.मगर प्र.शहर अभियंता :- प्रशासनाने पाहणी करुन रस्त्यांची निवड केलेली आहे. मा.महासभा ठरवील त्याप्रमाणे कामांचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस मंजूरीसाठी पाठविण्यांत येईल.

श्री.शेख नजीर महंमद नसीर :- सदर प्रस्तावातुन गंगाउद्यान रस्ता वगळलेला आहे. तो घेणेत यावा.

मा.श्री.किशोर डागवाले :- पुन्हा - पुन्हा तेच ते रस्ते का घेण्यांत येतात. रस्त्यांच्या कामाबाबत जो पाहणी अहवालाचा निकष लावला गेला होता त्या पाहणी अहवालानुसार रस्त्यांची निवड केली नाही काय ? सदर पाहणी अहवालामध्ये यापुर्वी सदर रस्त्यांचे काम केंव्हा करण्यांत आले. त्या रस्त्या बाबतच्या सद्यस्थितीची पाहणी करण्यांत आलेली नाही काय ? या रस्त्यांच्या कामाऐवजी सिध्दीबागेची दुर्दशा पहा त्याठिकाणी काम सूचवा.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- हद्दवाढीमध्ये अहमदनगर शहराच्या हद्दीमध्ये ज्या १२ गावांचा समावेश करण्यांत आलेला होता. त्याठिकाणी आजपर्यंत कोणत्याही मुलभुत सुविधा योग्य त्या प्रकारे पुरविल्या जात नाहीत. तेथील नागरीक महानगरपालिकेस मोठया प्रमाणावर घरपट्टी पाणीपट्टीच्या माध्यमातुन कर भरीत असतात. त्याप्रमाणात महानगरपालिके मार्फत सुविधा दिल्या जात नाहीत. हद्दवाढीतील कामांचा या यादीमध्ये समावेश करण्यांत यावा.

मा.सौ.संगिता खरमाळे :- झोपडी कॅन्टीन ते औरंगाबाद रोड रस्ता कशा पध्दतीने होणार याबाबत माहिती देण्यांत यावी. आनंदनगर शाळेजवळील रस्ता डांबरीकरण झालेला नाही. एकविरा चौक ते पारीजात चौक दरम्यानच्या रस्त्याचे रुंदीकरणासह मजबूतीकरण व डांबरीकरण करणे, गंगा उद्यान ते कलानगरचौक ते सपकाळ चौक दरम्यानच्या रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे, गुलमोहोर रोड ते महाराजा हॉटेल ते कुष्ठधाम रस्त्याचे डांबरीकरण करणे, गुलमोहोर रोड ते आसरा सोसायटीपर्यंत रस्त्याचे डांबरीकरण इत्यादी कामे करण्यांत यावीत.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत सादर करावयाचे रक्कम रु.४.८० कोटी चे प्रस्ताव मंजूरी करीता मा.जिल्हा नियोजन समितीकडे पाठविावयाचे आहेत. सदर कामांकरीता ५० टक्के अनुदान प्राप्त होणार आहे. व ५० टक्के नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा असणार आहे. सदरचा प्रस्ताव मंजूरीस पाठविणेकरीता मंजूरी देण्यांत यावी. सदरच्या प्रस्तावामध्ये आवश्यक ते फेरबदल करण्याचे अधिकार मा.महापौरांना देण्यांत यावेत. व सदरचा विषय मंजूर करण्यांत यावा. यादीसह ठराव लवकरात लवकर पाठवावा.

मा.श्री.किशोर डागवाले :- प्रस्तावात आवश्यक ते फेरबदल करण्याचे अधिकार मा.महापौरांना देण्यांत यावेत. तसेच सदर विषयाबाबत सर्व पक्षांच्या गटनेत्यांना बरोबर घेवुन चर्चा विनिमय करुन प्रस्तावातील कामे निवडण्यांत यावीत.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- सदर प्रस्तावामध्ये केडगांव विभागातील रस्ते डांबरीकरण करणे बाबतच्या विषयांचा समावेश करण्यांत यावा.

मा.आयुक्त सो :- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत करावयाच्या कामांचा प्रस्ताव महासभेची मंजूरी घेवून मा.जिल्हाधिकारी सो यांचेकडेस मंजूरीकरीता पाठविणे आवश्यक आहे.

मा.श्री.नितीन जगताप :- मा.श्री.बाबासाहेब वाकळे सभागृह नेता यांनी सुचविले नुसार सदरचा विषय मंजूर करण्यांत यावा. व फेरबदलासह यादी लवकरात लवकर ठरावासह पाठविण्यांत यावी.

मा.महापौर सो :- सभागृह नेता मा.श्री.बाबासाहेब वाकळे व मा.श्री.बाळासाहेब बोराटे तसेच मा.श्री.किशोर डागवाले यांनी सूचीत केलेनुसार मंजूरी देण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहामध्ये झालेली चर्चा तसेच मा.महापौर यांना सभागृहाने प्रस्तावात फेरबदल करण्याचे दिलेले अधिकार तसेच मा.सदस्य यांनी नागरी सुविधेच्या दृष्टीने वेळोवेळी सुचित केलेल्या कामांच्या मागणीचा विचार करता तसेच शहराच्या सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने खालील प्रमाणे प्रस्तावाचे यादीस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | टिळक रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे. | ४५,००,०००/- |
| २ | गजराज फॅक्टरी ते महाल (तपोवन रोड) रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | २४,००,०००/- |
| ३ | सागर हॉटेल ते जयहिंद चौक (दळवी मळा) रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १४,००,०००/- |
| ४ | गंगाउद्यान ते सपकाळ हॉस्पीटल रस्त्याचे रुंदीकरणासह मजबूतीकरण करणे . | २८,००,०००/- |
| ५ | नित्यसेवा रस्ता मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १०,००,०००/- |
| ६ | लिंक रोड भूषण नगर ते सावली सोसायटी रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १४,००,०००/- |
| ७ | नगर-पुणे रोड ते चर्च (सातपुते मळा) रस्त्याचे मजबुतीकरण, डांबरीकरण करणे. | १०,००,०००/- |
| ८ | नगर पुणे रोड ते ताराबाग कॉलनी ते देवी रोड रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १०,००,०००/- |
| ९ | नगर पुणे रोड अंबिका नगर बस ते पाच गोडावून रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | २०,००,०००/- |
| १० | बालिकाश्रम रोड ते व्दारका नगरी अमृत कलश अपार्टमेंट रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १५,००,०००/- |
| ११ | प्रोफेसर कॉलनी ते प्रेमदान चौक रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | २८,००,०००/- |
| १२ | पारिजात चौक ते कुष्ठधाम रोड मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | ३०,००,०००/- |
| १३ | सनी पॅलेस ते तपोवन रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १०,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १४ | डौले हॉस्पीटल ते रासने नगर ते भिडे हॉस्पीटल ते प्रेमदान हडको रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | ३५,००,०००/- |
| १५ | दिनेश हॉटेल ते आदर्शनगर कोपरा, नगर कल्याण रोड रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १५,००,०००/- |
| १६ | इम्पिरियल चौक ते चाणक्य चौक ते महादेव मंदिर बुरुडगांव रोड मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | ३५,००,०००/- |
| १७ | बंगाल चौकी ते बारा तोटी कारंजा ते म्यु.पल गॅरेज रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १२,००,०००/- |
| १८ | गुलमोहर रोड ते आसरा सोसायटी रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १०,००,०००/- |
| १९ | कोहिनूर मंगल कार्यालय ते अभियंता कॉलनी रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | १५,००,०००/- |
| २० | शितला देवी मंदिर ते सोळा तोटी कारंजा ते महेसुनी टेलर्स रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | ८,००,०००/- |
| २१ | आडते बाजार (नितीन चंगेडे यांचे दुकान) ते पॉवर हाउस रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | ७,००,०००/- |
| २२ | कॉग्रेस कमिटी ते मैदान आड ते लक्ष्मीबाई कारंजा रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करणे. | ५,००,०००/- |
| | **एकूण** | **४.०७ कोटी** |

सदर प्रस्तावांचा खर्च मंजुर. तसेच तद्नुषंगिक खर्च मंजूर. सदर योजनेची कालबध्दता पाहता सदर ठरावासह संपुर्ण प्रकरण मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे पाठविणेत यावे. सदर बाबत नियमानुसार पुढील उचित कार्यवाही त्वरीत करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.